## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १४९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०३/२०१७

**१) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे, तीन जखमी . :–**

दिनांक २८/०२/२०१७ चे १४.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी जखमी हा आपले साथीदार मृतक त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ बी ६५१७ चे चालक प्रवीन भाऊदास वासणीक वय २७ वर्ष, रा. मुजबी याचे सह त्याचे मोटार सायकल ने मौजा सुकळी येथुन नातेवाईका कडुन कार्यक्रम करुन आपले मुजबी गावी डांबर रोड नी परत जात असतांना विरुध्द दिशेने येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल वर ३ सीट बसवुन भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपने मोटार सायकल चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला समोरुन धडक मारुन फिर्यादीस व फिर्यादीचे साथीदारास गंभीर जखमी करुन फिर्यादीचे साथीदार प्रवीन याचे मरणास व स्वतःचे व इतर २ इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी अश्विन जगदीश खोबागडे वय ३० वर्ष, रा. जाक (मुजबी ) यांचे तोंडी व जखमीचे वैद्यकीय रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४,१२८/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२) अज्ञात ट्रॅक्टर चालकांने मोटार सायकलला धडक देवुन दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०२/२०१७ चे ०६.४५ वा. दरम्यान यातील जखमी सुरेश श्रीराम वैद्य वय ५० वर्ष, व त्याची पत्नी सौ. शिला सुरेश वैद्य वय ४५ वर्ष, रा. भंडारा हे मुजबी वरुन भंडारा कडे मोटार सायकल क्र. एमएच ३६ डी १४४३ ने डबल सीट जात असतांना यातील अज्ञात आरोपी ट्रॅक्टर चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन मोटार सायकलला धडक देवुन दोन्ही वर नमुद जखमी यांना गंभीर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १८४,१३४,१७९ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोडासे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) अंगावर पेटता दिवा पडुन जळाल्याने महीलेचा उपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिनांक २०/०२/२०१७ चे १९.१५ ते २८२०२/२०१७ चे ०७.१५ वा. दरम्यान यातील मृतक सौ. दुर्गा विनोद नागोसे वय ४० वर्ष, आंधळगाव पेठ हीने स्वयंपाक खोलीत खोलीत पाटीवर मातीचे तेलाचा तेलाचा पेटता दिवा ठेवत असता अचानक दिवा अंगावर पडुन जळाल्याने तिला औषधोपचरा करीता सा. रु. भंडारा येथे वार्ड क्र. १९ मध्ये भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. राऊत यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाभरे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २८/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१, तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

/01/3

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.